
विश्वनाथ खैरे
हिरकणी



कळतंय तशी गायी–म्हशींचंच करीत आलिया.



खिंडीतून वर चढायचं. मंग लागायचा दरवाजा.



म्हनले मी, पन बुरुज माझा नाय.

एकनाट्याचे आचार्य

पु. ल. देशपांडे

यांना आदरपूर्वक

शिवाजी महाराज आणि रायगड यांच्या पाठोपाठ हिरकणीची आठवण मराठी माणसाला होत असते. मुलाला पाजण्यासाठी जिवावर उदार होऊन कराल कड्याला पायतळी घालणाऱ्या त्या सामान्य गवळणीच्या गोष्टीचे हे ' एकनाट्य.'

तिची बोली म्हणून माझ्या निरक्षर शेतकरीण आईची बोली इथे वापरली आहे. कथन हिरकणीचे असल्यामुळे, महाराजांसकट सगळ्यांचे बोलणे तिच्याच बोलीत आले आहे. कथनातल्या बहुतेक जागा गडावर आणि आसपास पहायला मिळतात. डोंगराई तेवढी कल्पनेतली आहे.

हे एकनाट्य 'आजचा चार्वाक'च्या १९९६ दिवाळी अंकात प्रसिद्ध झाले होते. त्याआधी आणि नंतर त्याची दोन वाचने मीच वाईत व पुण्यात केली. ही हिरकणी आवडल्याचे सांगतानाच कमल देसाई, लीला अर्जुनवाडकर, उमा कुलकर्णी आणि अजित दळवी या जाणकारांनी कथनाच्या शेवटाचा फेरविचार करायला सुचवले. त्यांच्या सूचनेचा आदर पुस्तकात केला आहे.

हिरकणीप्रमाणेच तिचे एकनाट्य मराठी माणसांना प्रिय होवो.

राज्याभिषेक दिन १९९७ विश्वनाथ खैरे

# हिरकनी

मी हिरा.

गवळवाडीची.

न्हाइ वळख पटली.

आता मला गडावर हिरा म्हनीत न्हाईत ना. हिरकनी म्हनत्यात.

म्हाराजांनीच हिरकनी म्हनुन हाक मारल्यावर समदि तसंच म्हन-नार नाय का ?

आन ही आंगभरून साडीचूळी. म्हाराजांनीच दिल्याली. रोजरोज नीसतीया व्हय ? अवो, जपुन ठिवलिया. वर्सातनं यकदा नीसती. गडाव डोंगराईला, बुरजावsर यीती, तव्हाच. आज आली ना तशीच.

बुरुज तर तुमच्या वळखीचाच हाये. माजा हाये म्हनु का ? हसताल तुम्ही. हिरकनीचा बुरुज म्हनलं तर मातर नाइ हसायचात. मीच ना ती हिरकनी.

म्हनले मी, पन बुरुज माझा नाय. उभा कडा माझा व्हता. तुम्हीच सांगा बरं, वरमाइगत साडी नीसून ही हिरकनी बुरजावरनं उतरंल का?कमरंला गुडघ्यापुतुर धडुतं आन आंगावर गाठनीची चूळी व्हती म्हनून ती हिरा ह्या उभ्या कड्यावरनं उतारली व्हती.

गोष्टीतली गोष्ट ह्मये क्वा ती.

आज बुरजावर आली म्हनुन सांगती. अवो, रोजच्या श्यानगोठ्यात आन धारापान्यात दिवसरात कवा जाती कळत नाय. कुनाला सांगायचं आन कोन ऐकायचं ?

आता तुम्ही पुसलं म्हनून सांगती.

तर मी गवळवाडीची हिरा. गडाच्या बाजूलाच आमची वाडी. पाचाडावरनं डोंगराच्या बगलंनि जायाचं. धाईस घरांची तर वाडी. आमच्या घरात मंजी, सासू सासरा दीर नंदा आन कारभारी. मी तशी पोरवयातच सासरी आल्याली. बाईमानसाला चुकलंय का ते. आन आईबाप गेल्यापसुन सासार माह्यार याकच झाल्यालं.

कळतंय तशी गायाम्हशींचंच करीत आलिया. उठल्याउठल्या झाडुन काढा, शीनकूर करा, गवऱ्या थापा, वासरं सोडा, धारा काढा. मंग लागलीच गुरं सोडा, रानात न्ह्या आन तिनिसांजची माघारि आना. भाकर टुकडा रानातच खायचा. गुरं सावलीला असत्याल तव्हर आम्ही गुरखी पोरं खेळत बसायची. मला हवस नकला करायची. सगळ्यांला ख्या ख्या हसवायची. पुन्हा गुरं चारायची आन दिवस मावाळता घरि आनायची. अंधार पडला ना पडला तर गोठ्यातच यका बाजुला नाकाला गुडघं लावुन खालवर घालायची. डोळं उघाडलं की फटफटीत झाल्यालं असायचं.

ह्या रगाड्यातच कवा पोटुशी राहिली कळलंच नाही. चवथ्या पाचव्या महिन्यात रानात जायचं बंद झालं.सासू वाइच चांगल्याचुंगल्याचा आग्रेव करायला लागली. कारभारी कंदीमंदी निहाळाय लागलं.

आन सोन्या झाला.

अगदी तेराव्या दिशीच नाय बाजंवरनं उतरायला लागलं. सवा

महिना घरातच व्हती. दारच्या रेडकावानि सोन्या प्यायचा. प्यायचान गुडुप निजायचा. मी ताक घुसाळायची नायतर लूनी कढवायची. वासरांला पानी पाजायची.

सोन्या उलथापालथा व्हायला लागला. ननदा त्याला खेळवायच्या, गोठ्यात घिउन जायच्या. वाईच वड लागली की मी हाक मारायची आन सोन्याला पाजायची. महिना दोन महिनं असं गेलं.

मंग यकदिशी आत्याबाई म्हनल्या,

'हिरा, आता रानात नगं जात जाऊ. यका पाळीला गडावर जात जा दुध घालायला. उन्हाच्या आत माघारी यायचं, लेकराला दुपारचं पाजायला.'

म्या म्हनलं, बरं. दुसरं म्हननारच काय ?आन लागली मी गडावर जायाला.

गड आत्ता आत्ता माहिती झाला. आम्हाला रांगायला लागल्यापसुन डूंगूर माहिती. आईच्या गुडघ्यायवढी व्हती तवापसनं सरपानाला तिच्यासंगं जायला लागायचं. यवढुशी तरी मोळी डुइवर असायचीच. आन ती घिउनच, कड्याकपारीतनं, ढोरवाटंनि चढायचं न् उतरायचं. कुठूनबि कुठं जायचं. वाईच मोठं झाल्यावर गुरं चारायला जायची तवाबि तसंच. डोंगराच्या पाख्यानि जायचं, डोंगरावल्या तळ्यात गुरं पान्याव न्यायची; त्याच्यासाठी मंग कंच्याबि वाटंनि जायचं.

पन आता समद्या डोंगरावर हीऽ वर्दळ चालू व्हती. वाडं काय, देवळं काय, तळी काय.. साऱ्या डोंगरावर खाटखुट फाटफुट ठाकठुक आन मानसंच मानसं. मला काय़ कळायचंच नाय. मंग यकदा पहाऱ्यावरला शिपाईच म्हनला, आता म्हाराज यायच्यात हितं राह्यला.

मला वं काय माहिती, म्हाराजांला राह्यला समदा डूंगुर लागायचाय

म्हनुन. सबंद डोंगराच्या कडंनी, भिताड तरी बांधत्यात नायतर कडा तरी तासत्यात. पहिली आमच्या वाडीवरनं थेट वाट व्हती वर जायला. तीबि झाली बंद. आमी माकडावानि वर चढत जायचो त्यात आला अट-काव. आता पोक्त्या मानसावानि पार पाचाडाच्या बाजूला जायचं आन खिंडीतून वर चढायचं. मंग लागायचा दरवाजा. अग बयोव, डोक्यावली पाटी घट् धरूनसुधा वरपुतोर नजर काइ पोचायची नाही. त्याच्यावरबि पहारा. जल्मात कधी कुनी वर जायला अडावलं नव्हतं ति आता अडवा-यला लागली. पहिल्याच दिशी अनभाव आला.. मी आपली चालली व्हती डोक्यावर पाटी घिउन.मपल्याच नादात.तर शिपाई म्हनतो

'ए बया, चाललीस कुठं ?'

"डोंगरावर."

'डोंगरावर ? डोंगरावर जाचयं असलं तर त्या तिकडं जा. हिकडं गडावर कशाला ?'

"हावं हावं. गडावरच जायचंय. पहिली मी जायची ना गुरं चारायला, त्यानि तोंडात आलं, डोंगरावर."

'पाटीत काय हाये, गुरं का पोरं ?'

मला हासूच आलं.

'हासतीस काय ? नीट सांग काय हाये पाटीत.'

"अवो, दूध घालायला चाललिया."

'दूध गाईचं, का म्हशीचं का..'

चावटावानि बघत व्हता व माझ्याकडं. पन तितक्यात शेजारचा शिपाई काय म्हनतो,

'चौकीदार, जीभ आवरा. बाईमानसासंगं नीट बोला. म्हाराजांला कळलं तर जिभंचा टुकडा तुटंल. बाई,जा.दिवस मावळायच्या आत माघारी ये. दरवाजा बंद झाल्यावर खाली जायला नाहि मिळायचं.'

" अवं, मी कशाला थांबती दिवस मावळंस्तवर. लेकराला दुपारचं पाजाय नाय का जायचं मला."

आन मी गेली गडावर. चार घरी दूध घातलं सांगितल्यापरमानं. आयाबाया चांगल्या बिचाऱ्या. 'राधीची सून का ग तू ?' म्हनुन पुसलं. मी आपली चटाचटा निघाली. दिवस डोक्यावर यायच्या आत वाडीला पोचायला पायजे ना.

ति सगळं चर आन दगडामातीचं ढिगारं वलांडतानिच कटाळा आला. डोंगराव चालायचं लई सोपं. दरवाज्याव आली तवा सकाळचा चौकीदार वळाखल्यावानि हसला.

आन मंग रोजच जायला लागली. पहाऱ्यावरलं शिपाई, नाईक सारं वळखीचं झालं. हिरा हिराबाई म्हनायला लागलं. एकांद दिशी मी डोक्या वरली पाटी उतरून पायरीवर बसायची. पहारेवाल्यांच्या गप्पा ऐकायची.

'काय नाईक, आलेका डोनज्याला जाऊन ?'

नाईक सुस्कारा टाकूनच म्हनतु, 'व्ह ऽय.'

'का वो असं हिरमुष्टी बोलताय.'

'हिरमुष्टी नाय वो. पन धावत जायचं न् पळत यायचं. कारभारीन म्हनती पैलं हितं व्हता तेच बरं व्हतं.'

'असं कसं. बढतीवर आलात ना.'

'त्येच ना.अवो अष्टिमीच्या काळुख्यात सुभेदारांच्या मागुमाग डोनागिरी चढलो. दाढीवाले सात मारले. शेलारमामांनी महाराजांला शिफारस कीली,ह्याला नाईक करा.म्हाराज म्हनले, 'मानलं तुमचं. रायगडावर लावतो.' ह्येच शिंव्हगडावर लावलं असतं तर अशी धावपळ झाली नसती का नाय ?'

'म्हाराजांचं धोरान समजायचं नाय कुनाला.ठायबशी काम मिळालं मंजि ढिल्लं पडतं मानुस. म्हनून तुमची बदली हिकडं आन हिकाडल्या रावताची तिकडं.'

'ते आपल्यालाबि माहीत हाये वो. म्हाराजांची धोरनं लई लांबचं

बघनारी. अवो आम्ही डोनागिरी चढलो म्हनुन गड हातात आला. कुनीतरी म्हनलं, ह्या कड्यानि जय मिळवुन दिला. त्याच्या माथ्यावर शींदूर तरी लावू चला.म्हाराज म्हनले,'नाही.सुभेदारांचा चौदावा झाला की दुसऱ्या दिशी कड्याच्या माथ्यावर तट बांधायला लागा. न्हाई पुन्हा कुनी चढलं पायजे त्याच्यावरून.' तसं ऽ हितलं मानुस तिथं लावायचं ह्ये यवगीच हाये. पन त्या मानसाला ताटातुटी वाटायची ती वाटनारच ना.'

नायकाचं बोलनं मला काय पुरत उमाजलं नाय. उशीर होत व्हता म्हनुन गुमान पाटी उचालली आन चालायला लागली. वाईच खाली आली तर भेटलं घोगरे भटजी. मंजी ती काय त्यांचं नाव न्हाई. त्यांचं नाव मला माहितीच नव्हतं. ति घोगऱ्या आवाजात बोलायचं म्हनुन सगळी वाडी त्यांला घोगरे भटजीच म्हनायची. आधी पाचाडाला ऱ्हायचं. वाडीवर लग्न, कार्य काही असलं की घोगरे भटजींलाच बोलवायचं. पूरीबाळीशी सगळी त्यांला माहिती. आताआता त भटजी डोंगरावर, मंजी गडावर वो,राहायला गेलतं.आत्ता वर चाललं व्हतं.मागं याक पॉर, त्यांचं शिध्याचं गठुडं घिऊन चाललं व्हतं. त ऽर घोगरे भटजींनी मला बघितलं आन डोळ्याला हाताची सावली करून म्हनले,

' हिरा ना ग तू ? तुझं लगीन म्याच लावलं.'

वाडीतली कंचीबि पूरगी, बाई दिसली की घोगरे भटजी पहिलं ह्ये बोलायचं. मी म्हनली, हां.

' गडावर कशाला आलतीस ?'

" दुद घालायला. रोज यीती."

' रोज येतीस का ? बामनवाड्यात येत नाहीस का ? येत जा ना. आन ह्ये बघ. आमच्या कमळीचं ढवाळजेवान हये. दळानकांडान करायचंय वाइच. कमळीच्या आईला मदत पाहिजे थूडी. तू येत

जा ग चारदोन दिवस.'

"काका, लेकराला दुपारचं पाजायला जावं लागतं."

' जा ना. अगं दुपारचं यायचं. कमळीच्या आईला तरी सकाळी कुठं येळ असतो सकाळचा. चार घटका काम करायचं आन जायचं संध्याकाळच्याला.'

" आत्याबाईला पुसत्ये."

'कुनाला, राधीला ? अगो, तिचं लग्न मीच लावलं. ती काय नाही म्हनते, माझं नाव सांगितल्यावर ?'

तेवढ्यात काय झालं, गठुडंवालं पोरगं त्यांच्या वाईच जवळ आलं. घोगरे भटजी टुनकुनि लांब सरलं, तर त्यांचा तोल गेला. म्हनुन म्या त्यानला हात दिऊन सावारलं.

'शिंचे. आता घरी गेल्यावर आघुळ करावी लागंल मला. पोरा,इतकं खेटायला कशाला येत असतुस ? हिरा, ये बरं का नक्की.'

घोगरे भटजी गेलं. मीबि घरी आली. सासूबाईला सांगितलं. सांगतानि घोगरे भटजीचा आवाज काढीतच बोलत व्हती मी. सासूबाई म्हनल्या,

'हिरा, भटबामनाची चेष्टा करू नाही अशी.'

कारभारी भाकरी खात व्हतं. ऐकत व्हतं. म्हनलं,

'चेष्टा करूऽ नाऽही. तुला आई लई पाघुळ भटबामनाचा. देखलं तिथंच टेकलं. दिसली हिरा की काढलंच काम. दिसातनं दोनदा गडावर जायला लागंल हिराला. अगंऽ दुपारचं यायचं वऽर. सहज बोलता येतं त्यानला. धरलंस कशाला. पडुन द्यायचं. आंगाला हात लागला तर आंघुळ करावी लागती. दळनाला हात लागला तर बरं चालतं.'

'मानुस न् कनुस काय सारखं हाये का. त्यांचं सास्तार मारुग त्यानला करावं लागतं. जाईल चार रोज हिरा दोन बारीला. कावळ्याला न् गवळ्याला डोंगराव जायचा तरास वाटतो का सांग.

कारभारी कुरकुर करीतच व्हतं. पन मी· लागली दिसातुन दोनदा जायला. सकाळच्याला दरवाज्याच्या जवळजवळच पेठंला जायची मी. दुपारचं पार बामनवाड्यात जाया लागायचं. त्यातुन घोगरे भटजीचं घर पार टोकाला. पहिल्या दिशी यका बाबाला पुसलं, तर त्यो म्हनला, हितं घोगरे भटजी नाही कुनी रहात. तितक्यात त्या तिकडं मला घोगरे भटजीच दिसलं. म्या म्हनलं, ति काय ते. तर ति बाबा म्हनतु,'त्यो तर भिकंभट. घोगरे भटजी काय म्हनतीस ?' मी कशाला वं थांबतीय तिथं. गीली भटजीकडं. भटजीनी लीकीला हाक मारली. 'कमळे, अग ही हिरा आलीय बघ.हिला दे काही काम.' माझ्याच शिनंची पूटुशी पूरगी बाहेर आली. अवघाडतच चालत व्हती.

मी मनात म्हनते, कमळी तर हीच. घोगरे भटजी तर म्हनलं व्हतं ढवाळजेवान. आन हिचं तर दीस भरत आल्यात. मला काय वाटलं व्हतं, ढवाळं लागलं मंजी पोटात ढवळुन जेवनावर वासना रहात नाही-ना, त्याच्यासाठी देवाला कायतरी जेवान घालीत असत्याल. माझीच मावसभैन दगडी हाये ना, तिला लई कडक ढवाळं लागलं व्हतं. मला नव्हतं काय झालं. मला वाटतं माज्या पहिल्यादुसऱ्या महिन्यात रानात-लीच चिचा बोरं मी खात व्हती.पन दगडीसाठीबि आमच्यात काय जेवान-बिवान नव्हतं केलं. म्हनलं भटजींच्या घरात तशी चाल असंल. पन ढवाळ्याचं जेवान सातव्या महिन्यात हे काय समजानाच. मनात म्हनलं, भटांचं काय समाजतं आपल्याला.

गीली दोनचार रोज. उन्हाची वर जायाची न् दिवस खाली गेल्या-वर निघायची. दरवाज्यावर चौकशी झालीच. ती चुकतीय का.

'काय ग हिरा, दोनदा गडावर यायला लागलीस ती ? आन दुधाची पाटी कुठंय ? काय म्हनून सोडायचं तुला आत ?'

"दुद घालायला नाय येत दुपारची. घोगरे भटजीच्यात कामाला जाती."

तेवढ्यात ध्यानात आलं, ह्यानला घोगरे भटजी माहीत नसत्याल. म्हनुनं सुदरून घेतलं.

"मंजी भिकंभटांच्या घरी."

तर चौकीदारच घोगऱ्या आवाजात म्हनतो कसा,

'शिंचे, घरास परत जायचं असलं तर दिवस मावळायच्या आत परत येत जा.'

आन त्यो हसला. मीबि हसतहसत पुढं गेली.

ज्या दिशी जेवान व्हतं त्या दिशी माझा पिट्ट्या पडला. कमळीची आतबाहेर चाललीच व्हती. हे कर, ते कर सांगत व्हती. आता निघायचं तेवढ्यात घोगरे भटजी कुनाकडनं तपॅलं घिउन आलं.

'हिरा, एवढं जरा घासुन दे.'

आता हिराची काय बिशात नायव्हय म्हनायची. वाईच गवात घेतलं, माती घितली, आन खसाखसा घासलं आतबाहेर. भडाभडा पानी वतलं, हातपाय धुतलं आन तपॅलं वसरीवर ठिवलं. कमळी तांब्याभर पानी घिउन आली,त्याच्यावर सवळं शिपायला. तव्हर मी धुमाट पळाली. माथ्यावर आली तर सुर्व्याचा गोळा लाल दिसत व्हता. मनात म्हनलं, वाईच धावत गेलं तर घावल दरवाजा. वहाग मागं लागल्यागत जिवाच्या आकांतानि पळाली बघा. पेठ वलांडली, तळ्याच्या कडंनी धडाधडा उतारली, लहानसान चरावरनं न् ढिगाऱ्यावरनं उड्या मारल्या, आन दरवाज्याला पोचली. संबुर बघतीय तर काय ! दरवाजा लागल्याला !

"नाईक, अवं नाईक, वाईच मला जाऊन द्या ना."

चौकीदार दचाकलाच.

'हिरा ? तू ? काय म्हनलीस ?'

"मला वाईच जाउ द्या ना."

'कुठुन जाउद्या ?'

"वाईच दरवाजाला फट करुन द्या. मी जाईन मांजरीगत."

'अग माझ्या आई,तू जाशील मांजरीगत न् मला दीशील वाघिनीच्या

तोंडात. दरवाजा क्व्हाचा बंद झाला ठावं हाये का तुला ?'

"मी निघाली तव्हा दिवस वर व्हता वो."

' अग येडे, बामनवाड्याच्या चढावरून दिसला तुला वर. दरवाज्याच्या म्होरं येवढा मोठा डूंगूर.हितं दिवस आधी मावळायला जातो.'

"तुमचं खरं वो. पन कायतरी करा ना."

' हिरे,म्हाराजांचा कायदा माहिती नाही तुला. दिवस मावाळता दार झाकलं पायजे, आगळ लागली पायजे. आता दिवस उगवस्तवर, द्येव बाहेर येउन उभा राह्यला तर आत येऊन देनार नाही, आन आतून स्वत्ता म्हाराज आले तरी त्यांला बाहेर जाऊंदेनार नाही."

"स्वत्ता म्हाराज ?"

'व्हsय व्हsय. येत्यात कवाकवा. परीक्शा बघायला. यकदा आलतं असंच तुझ्यावानि. म्या म्हनलं, तुम्ही कुनी तरी म्हाराजांचं सॉंग घेऊन आलायित. मुकाट्यानं माघारी फिरा, नायतर गडकऱ्यांला घेऊन या. गेलं माघारी. दुसर दिशी सकाळीच गडकरी आलं आन शाबासकी दिऊन गेलं.तवा दरवाजा उघडायची गोष्टच मनातसुधा आनू नगंस.'

"मंग आता काय करु वो ?"

'घोगऱ्या भटजीकडं जेवायला जा.रातचि रात रहा आन उद्या दीस उगावताच ये.'

"मला त्यांनी जेवायला कुठं बोलावलंय. आन मला माझ्या जेवनाची काही काळजी नाय वो.लेकराच्या जेवनाची हाये. आंगावर पेतंय लेकरू, वरचं काय खात नाय."

'हिराबाई, ह्यो टकमक कडा हाये ना, त्याचाच आसरा आता आपल्या दोघांलाबि. मी दरवाजा उघडुन देतु तुला आन जोतु टकमक टोकाला. उद्या म्हाराजांनी कडेलूट करायचा त्याच्यापक्शी आजच उडी मारतु जाऊन.'

"अवं काय बोलताय !"

'खरं तीच बोलतुय. पन नसलं तुला ति बरं वाटत, तर तू जा त्या टोकावर.गडाव दुसरीकडं नाबूत जागा नाय उतरायला.टकमक टोकावनं उडी मारलीस तर पापणी लवस्तंवर जाशिल खाली. जगली वाचलीस तर जा घरी.'

मला सनक आली.मी उठली आन तोंड फिरवून चालाय लागली. त्याला काय वाटलं कुनाल ठावं, लागला मला हाका मारायला.

'हिरा, ए हिरा, खरंच टकमक टोकाला निघालीस का काय ?नग नग. मागं फीर. अगं गमतीनि म्हनलु मी. ऐकलंस का ?'

म्या ऐकलं, पन मागं बघितलं नाय. ढांगा टाकित निघाली. टकमक टोकाला नव्हती चालली. शाबूत आंगानिच घरला जायचें व्हतं, माज्या सोन्यासाठी. पन जायचं कसं ?

मी वर गीली. उजव्या बाजुला वळली. भराभरा चालाय लागली. दिसंल त्या देवळाला हात जूडीत व्हती.. देवबाप्पा, मला वाट दाखव.

मी झपाझपा चालतच व्हती. कडुसं पडायला लागलं व्हतं. एखांद जागी यकदम अंधार वाटायचा. कधी वाटायचं, आपल्याला कुनि पकडुन तर न्हायचं नाय ?तरी मी बेभान चालत व्हती. चालायची, पळायची, उड्या टाकायची.

करता करता डोंगराईच्या दगडाजवळ आली. डोंगराई गडावर कुनाला माहीत नव्हती. आमची गुरख्या पॉरांची दाटीमुटीची दीवी. कवा यकदा आमच्या मनात आलं, एऽ ह्या दगडाची आपुन दीवी करू. मंग काय, उठली समदी भराभरा.बिट्ट्यानि यवढायवढा जागा झाडुन काढला, हौशीनि शेनाचा पौ आनला, म्या यका दुरवनात गोमतार धरून आनलं, दगडावर शिपाडलं आन औरसचौरस जागा सारवुन काढली. हिला आपुन डोंगराई म्हनायचं असं ठरलं. कधीतरी भाकरी खायला बसतानि कानायवढ्या तुकड्याचा निवद दावायचो आम्ही पोरं. बास.

आज मातर म्या डोंगराईपुशी खिनभर थांबुन तिच्यावर डोकं ठुलं.

म्हनलं मला वाट दाखव, माझ्या सोन्याकडं सुखरूप पोचव. डोकं उच्यालल आन पुन्हा तडातडा चालाय लागली. चालताचालता उजव्या बाजूला नदार टाकित व्हती. त्या बाजूला तटाची भित लांबलचक दिसत व्हती. कुठं म्हनुन सांद का फट दिसत नव्हती. कुठंतरी भित सरंल असं वाटत व्हतं.

सरली बया म्होरं गेल्यावर. भितीच्या म्होरं वघळीवानी लवान व्हतं आन पड्याल टेकाडाचा खडुक दिसत व्हता. मी वळली आन ह्या हितं आली. म्हनलं, आपुन आलो उभ्या कड्याच्या माथ्याला. पाचाडाच्या वाटंनि दिसायचा ना काळ्या भिताडागत. म्हनुन तर वाडवडलांनी उभा कडा नाव दिलंना. तव्हा खालुनखालुन बघितल्याला. आता त्याच्या वर यिउन उभी राहिल्याली.

खरं सागते. जल्म गेला डोंगरात. दरवाज्यापुशी बसली व्हती तवा टकमक कड्याचीसुधा भिति वाटली नव्हती. पन त्या सांजच्या पहारी उभ्या कड्याच्या खाली बघितलं आन डोळं फिरल्यागत झालं. काय सुचाना. पाय घळाटलं म्हनुन खाली बसली. चितागति व्हउन टुकुटुकु बघत व्हती.

त्या झांजरयेळंला, त्या भुरक्या कड्यावर दोन जागी मला शेळ्यामेंढ्याच्या लेंड्या दिसल्या.

आन मी तट्‌कुनि उठली. माझ्या पायाला शेळीमेंढीच्या नख्या फुटल्यागत मला·वाटलं. उजव्या पायाचा आंगठा यका कपळीवर टेकावला, दून्ही हातानि वरच्या दगडाला धरलं, डावा पाय लेंडीच्या जाग्यावर टाकला, आन कड्यावरून एकेक पाय खाली टाकाय सुरवात कीली.

वाईचवाईच अंधारायला लागलं व्हतं. पन चांदन्या दिसत नव्हत्या. पायापुरतं दिसत व्हतं. दोन हात न् दोन पाय, कधी पाठन तर कधी पॉट तर कधी बूड, असं वर खाली, बाजुला टेकवीत, सरकत खुरडत,

बसत उठत, मी खाली जायला लागली. हा बुरुज आता झाला आन कडाबि आता तासून काढला. तवा कराळ व्हता पन इतका थाट् नव्हता. शेरडीचं खुर टेकवायला आधार व्हता थोडाथोडा. तेवढा आधार नदरंनि टिपायचा, आन हातापायाची बोटं तिथं टेकवायची. कवा इतभर, कवा हातभर, तर कवा परसभर उतरायचं. कवा वाईच बाजुला वरबि चढावं लागायचं. घसरुन खाली जायचं नाही यवढंच बघायंचं.

अंधार वाढाय लागला. थोडा ईळ काळुखं वाटलं, बरंच झालं. लांबचं दिसायचं नाही. कडा खॉल वाटायचा नाही. त्यानि सगळं ध्यान पायापुरतं. खडा, दगुड, कपार, गवात, झुडुप ह्याच्याशिवाय काही म्हनता काही दिसत नव्हतं. सोन्याचीसुधा सुधबुध नव्हती.

कडा उतारली.पाचाडाच्या वाटंला आली. आन माझ्या पायातल्या नख्या निघाल्या जनु. माझं पाय लटालटा कापाय लागलं. चरबरीत वाटं-वर पाय घसारला आन कसंतरी करून भुइवर बसली. पिंढऱ्यांला न् कोपरांला लागलं व्हतं वाटतं. त्याचा वाइच ठनका बि लागला. पन हळुहळु पाय कापायचं थांबलं आन सोन्याची आठवन झाली.

आन जी डोळ्याला धार लागली ती काय खळाना.

वाइच वादुळ वाहून् दिलं डोळं.मंग मपलं म्याच मनाला समजावलं. डोळं पुसलं. उभी राह्यली. तर कड्याकडं तोंड झालं. अंधुकअंधुक दिसत व्हता. मला वाटलं जनु आभाळाला टेकलाय. देवळात गेल्यागत दंडवत घातला त्याला. आन सोन्याच्या वडिनी, वाडीच्या वाटंकडं चालाय लागली. पाय झपाझपा पडाय लागलं. वढ्याच्या जवळजवळ आली तव्हा वाट घावली. आन मंग मी सुसाट पळत सुटली. आंगनातुन धापा टाकित उंबऱ्यात आली.

कधी नाही ति घरात दगडी दिव्याचा उजेड़ मिनमिन करित व्हता.ननंदभावांच्या आळाशा पडल्या व्हत्या. आत्याबाइ तेवढ्या जाग्या.

सोन्याला मांडीव घिउन बसल्याल्या. सोन्या दिनवानि निजल्याला. हि समदं मी आता सांगति खरं, पन तवा मला दिसलं व्हतं का नाय कुनाल् ठाउक. मी फत्कनं खालि बसली, सोन्याला वढुन घेतला आन थानाला लावला. सोन्या झोपंतच व्हता. दुधाचा पहिला वघुळ त्याच्या गालावरनं खालि गेला.

मान हलवून सोन्या चुरुचुरु वढाय लागला. सगळं गप्. आत्याबाइ येकटक गपचिप बघंत व्हत्या. यकदमच म्हनल्या,

'आली गऽ गाय माझि गोठ्याला.'

आन त्यांनी माझ्या कानशिलावर हात फिरवून सोताच्या काशिलावर कडाकडा बोटं मोडली. त्यांच्या डोळ्यातनं घळाघला धारा लागल्या.

सोन्या चुरुचुरु प्येत व्हता. दीर ननदा येकयेक करून जाग्या व्हाया लागल्या. तटातटा उठून बसल्या. सगळ्यांलाच बोलायचं व्हतं. लागली बोलायला.

'लेकरानि रडुनरडुन गूंधुळ घातला.जलामल्यास इतका कधि रडला नव्हता. थोरापोराशि समद्यानि कायकाय केलं पन रडायचा थांबाना 'वैने, का ग उशिर झाला ? सोन्याऽ आवराना आन दादाबि लागला तनतान करायला.'

धाकला दीर वाइच खट्याळ.दादागत आवाज काढुन बोलाय लागला,

'बसली का काय चौकीदारासंगं गप्पा मारित ?का राह्यलि घोगऱ्या भटजीच्या घुगऱ्या खायाला ? वैने,म्या म्हनलं दादा,घोगऱ्या भटजीच्यात बारसं नाय,ढवाळ्याचं जेवान हाये.तर माझ्याच मागं लागला चिपाड घिउन.'

'पिऱ्या, तू निसत्या नकलाच सांग. वैनीला वाटंल दादाला तिची काळजीच नाही. वासरू कसं दावं तोडतं न् उधाळतं तसा धावत गेला गडाच्या वाटंनि. आबा म्हनत्यात, 'अरं जपुन जा. यिईल इतक्यात. व्हतो वाटंनि कायतरी खोळांबा.'पन ऐकायला दादा कुठंय? वढ्याच्या पांदीला पोचला व्हता. तुला भेटला का ग ?'

मी न्हायव्हय म्हनस्तंवर बापलेकांचं बोलनं मोठयानि ऐकू आलं.
'खिंडीच्या म्होरं कोसभर गेलतो. मागमूस नाही.वाटंनि ह्यालात्याला पुसत गेलो. पारामागली धुरपी गवऱ्या घिउन गेलती. ती माघारी येत व्हती. मला म्हनली, 'दुपारा आम्ही संगंच गेलतु.म्या म्हनलंबि व्हतं, हिरा, जातानीबि संगंच जाऊ. तर ती आलीच नाय बघा.' पाचवडाचा यकजन भेटला.म्हनला,'भल्या मानसा,आता वर जाउन काय दरवाज्यावर डोकं आपटुन घ्यायचंय का ? जा आपला घरी.' म्हनुन माघारी आलो.'

'बरं बरं. अरं गुरूसुधा रानात राहिलं त सकाळचं घरी येतंय. का म्हनुन म्हनायचं, लांडग्यानिच धरलं वाटतं ? उद्या सकाळचाच जा गडावर आन कर तपास. चल घरात.'

'जा तुमी. हिराला आनल्याखिरिज घरात पाउल टाकनार नाय.'

माझ्या डोळ्यावर उजेड व्हता म्हनुन म्या अंधारात तोंड फिरावलं, आन मनगाटानि डोळं पुसलं. हिकडं दीर म्हनतु कसा,

'दादा, मंग तुला घरात कधीच नाय येता यायचं.'

सासरं जोरात गराजलं,

'पिऱ्या, तिनिसांजचं वाईटवकटं बोलु नगस.'

आत्याबाई लगबगिनं उठल्या. दिराच्या पाठीत योऽक धपका दिला, आन दारात जाउन म्हनल्या,

'अवं, तुमीच नका वाईटवकटं बोलू.आत या दोघंबि.हिरा आलिया.'

'आली ? बघ मी काय म्हनित व्हतो ?'

' मंग मला कशि भेटली न्हाइस ? टंगड्या मोडल्या माझ्या. मला चुकवुन का आली सांग.'

आता ग बया, आंगनात कसा आन उंबऱ्यात असा! आता काय सांगु मी ह्याला ?

नशिब माझं, मला काइ सांगावंच लागलं नाय. ननंदच उसाळली,

'दादाऽ आत्ता नवाजला म्या तुला वैनीच्या म्होरं. घरात पाय नव्हता

टाकायचा तुला वैनीखिरिज. आन घरात दिसलि ना दिसली कि केवदारतुयास ! मोठा कारभारी रे दादा ! तुझ्या टंगड्या मोडल्या आन ती काय पालखीत बसुन आली, व्हयरे ? वाइच तिच्याकडं बघ तरी.नखभर जाग्या शाबुत हाये का दाव तिच्या आंगावर.'

तिच्या दादानि बघितलं का नाय कुनाल ठाउक. म्या मातर पहिल्यानिच हातापायाकडं बघितलं. चिलाराच्या फांदिनि खरारा केल्यागत आंग झाल्यालं समदं. तेवढ्यात सासऱ्यानि गाडी सावारली.

'हिरा, पूरी, आडवाटंनं आलीस तू.लई 'भारिष्ट ग तुझं. नबे,तिच्याकडं निसती बघतच राहिलीस व्हय ? पानी ठिव चुलीवर. वाइच शेक तरि तिला.'

ननंद उठली. चुलिकडं गीली. सासुनि सोन्याला माझ्या मांडीवरनं घेतला आन खालि निजावला. नवरा मिटिमिटि खालि बसला.म्या नंदंला खुनावलं, चुल पेटवु नगं म्हनुन. तिनि पितळीत भाकरी न् दूध आनून ठिवलं माझ्या म्होरं. चार घास खाल्लं. मंग दिरच म्हनला,

'वैने, काय झालं सांग तरी.'

" अवं, काय नाय. घोगऱ्या भटजीच्या घरुन निघायला झाला उशीर.दरवाज्याव आली तर दरवाजा बंद. चौकीदार मुळिच तयार नाय यिउन द्यायला. म्हनुन फिरली माघारी, गेली डोंगराच्या टोकाला. उभ्या कड्याच्या माथ्यावर बसली. तर खालच्या बाजुला शेरडीच्या लेंड्या दिसल्या. म्हनलं, शेरडंकरडं उतारत्यात हितून तर जाउ आपुनबि. आन उतारली कि वं धडपडत. पालखीत नाय आली खरंच हाये. पन म्या काय दरवाजावल्या नायकागत मोठि लढाइ नाय मारली."

'बढाइ मारता येत नाइ तुला वैने, लढाइ काय मारनार तू ? पन दादाला चुकवुन का आलीस ति तर सांगशिल का नाय ?'

आता पुन्हा लढाइ सुरु व्हतीया वाटलं.पन आत्याबाई मधि पडल्या.

'पिऱ्या, सकाळच्या पारी सांगंल तुला. आता निजु दे तिला. निमी रात झाली. उठ, जाउन पड जा गोठ्यात.'

मी तिथंच सोन्याच्या बाजुला कलांडलि. उठलि तवा दिवस उगाव-ल्याला व्हता, आन सोन्या माझ्या बाजुला खिदळत व्हता.

घटकाभऱ्यानि पाटी भरली आन गीलि रोजच्यासारखी. मनात हीच की, आज दुपारुन काय पुन्हा वर जायचं नाय.दुपारच्याला वाइच लौकर माघारी जाऊ. दरवाज्याच्या पायऱ्या चढत व्हती मपल्याच नादात. तर यकदम हाक आली,

'हिरा ? हिरा तू ? हिरा, तू वाडीवरनं आलीस ? ए हडळी, बोलत का नाईस ?'

आता, मला बूलुन तरि देत्याल तवा ना ! मला त कळानाच कि ही असं का टाफारत्यात.

' अगऽ, काल दरवाज्याच्या आत थोपावली ना तुला ? मंग आज सकाळीच ह्या बाजुला हाजर कशि तू ? का खरंच टकमक कड्यावनं उडी मारलीस,दगावलीस न् हडळ व्हउन आलीस माझा गळा दाबायला.'

तेवढ्यात नाईकच आलं तिथं. लागलीच म्हनलं,

'काय गडबडय चौकीदार ?'

'अवोऽ, ही हिरा. काऽल, दरवाजा बंद झाल्यावर वरून आली, म्हनुन जाऊन दिली नाहि. तरी आता दिवसाच्या आत पाटी घिउन हाजर ! रातची खाली गीली कशी ? आन कुठून ?'

'खरं का ग ? काल दुसऱ्या कुठून खाली गेलीस का तू ?'

"व्हय. ह्यांनि सोडलंच नाय हितुन. ह्यांनि अजिबात दरवाजा उघाडला नाय बघा."

' ह्यांची काय माय यीलीय दरवाजा उघडायला. पन हिरा,खाली जायला वाट कुठं घावली तुला ?'

"वाट कुठली वो दादा. डोंगराव काय, आपुन चालू तीच वाट नाय का?'

' डोंगरावर बरुबर. पन गडावर तसं चालत नाही.'

' तुलाऽ मीऽ आत जाऊन् देनार नाहि. पाटी उतर.'

म्या पाटी उतरुन ठिवली.जानारयेनार दुसरीबि धापाच जमा झाली. मंग नाईकच म्हनलं,

' हिरा, तू उतारलिस ती जागा मला दाखव. चल.'

" मी यवढं दुद घालुन यीती आन मंग दावती."

'मुळीच नाय. मी हिला आतच शिरून देनार नाय.'

"अवं रातच्या धाराचं दुद हायं. उशिर झाला त नासुन जाइल. मी रोजची येनारि. यवढं घालुन यीति ना माघारी."

'यकदा आत गीलिस कि पुन्हा गुंगारा दीशिल. तुझा काय नेम.'

"अवं, काल लेकराला पाजाय जायचं व्हतं. ध्यादुपारा कशाला जिवावर उदार व्हऊ ?"

'काल दुद नासुन दिलं नाइस ना. आज नासुदे मंग. तू आधी नाइ-कांच्या संगं जा. चल नीघ.'

व्हयनाही करताकरता नाईक मला घिउन निघालं. आन ही झुंड निघाली आमच्या मागं. चार पायऱ्या चढल्याबरुबर नाईक उभं राह्यलं. आन मागं वळुन म्हनलं,

'हिरा सूडून कुनीसुधा मागं यायचं नाय. खबरदार !'

त्यानची लई जरब. दावनीला बांधल्यागत समदी जागच्या जागी उभी राहिली. आमी दोघंच मंग चालाय लागलू.

मी त्यानच्या मागं मागं चालली व्हती. मंग त्यानचि त्यानलाच काय वाटलं कुनाल ठावं, मला म्हनलं, पुढं चल. तर मी पुढं चालली. माझ्या डोक्यात ती डोक्यावनं उतरून ठिवल्याली पाटी. हिकडंतिकडं ध्यानच नाही.इतक्यात खुट आवाज झाला आन नाइकानि आइवरनं शिवी दिली. मी मागं बघती त त्यानला लागली व्हती ठेच. कशाचि म्हनताल, तर डोंगराइच्या भवतालि दगाड लावलं व्हतंना, त्यातल्याच येका दगडाची. ति आलं मंग सावरुन पुढं

आमी दोघंबि उभ्या कड्यापुशि आलो. उतरायसाठी मी ज्या जाग्या

वर टीकली व्हती,तिथं उलिशीक खून दिसत व्हती. म्या नायकांला म्हनलं, दादा, ह्यबगा हितं.

नाईक तिथं यिउन उभं राह्लिं. दिवस वर आलता. वाईच वाऱ्याचि झुळुक व्हती. मी कडंला उभी व्हती. आन यकदम कि वं सुसाट वारा आला. मी त व्हलपाडलीच. नशिब जोरावर म्हनुन डोंगराच्याच बाजुला कलांडली. सावरुन उभि राह्यली. तर नाईक म्हनत्यात,

'हिरा, वाऱ्यानि व्हलपाडतीस न् ह्या कड्यावनं उतारली म्हनतीस. आता चौकीदारच गवाई देतोय म्हनुन खरं मानतु. पन कशि उतारलीस सांग तरि मला. मीसुधा डोनागिरि चढलो. पन घोरपड न् दोर व्हता चढायला. देवाशिफ्त, मला कुनि लाख मव्हरा दिल्या तरि मी ह्या कड्यावरुन उतरायचो नाय.'

"तुमाला वं कशाला उतराय लागतंय हितुन ? दरवाजाच तुमच्या ताब्यात हाये ना."

नाईक कड्याकडंच बघत व्हतं. मला पुन्हा पाटीची आठवन झाली.

"दादा, जाऊ ना आता माघारी ? दुद पार नासंल बघा."

नायकाचं काय माझ्याकडं लक्ष नव्हतं. मी धीर करुन.निघालीच म्हनुन निघाला बिचारा. आमी दोघंबि डोंगराइच्या दगडापुशि आलु.

'हिरा, दीविबिवि आंगात यीति का ग तुझ्या ?'

मी हसायलाच लागली.

"अवो दादा, दीवि कशि यिइल माझ्या आंगात ? दीवि कळतीय का तरि आमाला? ही बघा आमि गुरख्या पोरांनि ह्या दगडाचीच कीलती डोंगराइ दीवी. काल हिलासुधा हात जोडलं म्या."

'डोंगराई तुझ्या पाठीशी व्हती, हिरा.'

"डोंगराइ पाठीशि व्हती का नाय मला माहिती नाय. डूंगूर पाठीशि व्हता यवढं बरीक खरं."

नाईक काय बोललं नाय. दरवाज्यापुशि आल्यावर चौकीदाराला यवढच म्हनलं,जाउदे तिला.म्या लगबगिनं पाटी उच्यालिलि न् वर गीली.

रतिबाच्या घरी दुद घातलं. पार दुपार करुन दुद आनलं म्हनुन त्यांची बोलनी खाल्ली. सांगायचं तरि कुनाकुनाला आन कायकाय म्हनत गप ऐकुन घेतलं. तडातडा घरी गीली. उशीर का झाला कुनी पुसलं नाय न् म्याबि चकरा सबुद तोंडातनं काढला नाय.

सांजच्या पारी सासरंच आत्याबाइनला म्हनलं,

'तुमाला मानसाची किंमत नाही. पूरगी रातची धडपडत आली तरि सकाळच्याच पारी गडावर लावली तिला. उद्यापसुन बंद करा तिचं जायचं.'

दुसऱ्या दिसापुन आत्याबाइ जाया लागल्या. मी लागली श्यानगोठा सैपाकपानी करायला.

आन दोनचार दिसानि, मी अंगान सारवुन घेत व्हती, तर मोठी वरात कि वो आमच्या घराकडं. दोन शिपाइ म्होरं आन वाडीतली लहान थोर मानसं त्यांच्या मागं. कुनीतरी म्हनलं,

'पिऱ्या, आबाला न् दादाला बूलवून आन जा. ह्ये गडावनं आल्यात तुमच्याकडं.'

योक कोपरा राहिला व्हता सारवानाचा. तरी मी आपली घरात गीली आन सोन्याला घिउन दाराआड बसुन राहिली. काळिज लकलाक करित व्हतं. बापीमानसं आली लवकरच.

'रामराम. आमी गडावनं आलोय. म्हाराजांचा हुकुम हाये. हिरा गवळन तुमच्याच घरची ना ?'

'व्हय..व्हय..आमचीच..आमचीच..सून.'

सासऱ्यानला बोलनं सुदरत नव्हतं. त त प प करित पुन्हा म्हनलं,

'का.. काय हुकुम हाये हिरायिकि ?'

'आमच्यासंगं गडावर लावा तिला.'

म्या सोन्याला उराशि धरला. गच दाबुन धरला. वट्यावर इतकी मानसं, पन हू का चू नाहि कुनाची. कारभारी वाइच रागीट डोक्याचं.

शिपायानला म्हनलं कटतं,

'कशापायि ?'

'ति आम्हाला काय माह्ति ? पन ती हिरा यकदिशि रातचिच गड उतरुन आलतिना कटतं ?'

अरं द्येवा ! सोन्या, कायरं लागलंय आपल्यामागं ?

'आलती. तिनिसांजचिच आलती.'

'त्याचाच जरजा चाललाय गडावर.आता त काय,म्हाराजांनीच हुकुम दिलाय.'

'काय व्हइल वो, हिराला काय व्हनार त नाय ना ?'

'ति आमी काय सांगावं ? पन मागं यका गडावर म्हाराजांनि पैन पाडली व्हती. भलत्या वाटंनि जी कुनि गडाव यिउन दावील त्याला हजार होन बक्षीस.'

'मंग कुनाला मिळालं बक्षिस ?'

'अवो, यका म्हारानि अवघाड वाटंनि चढुन दाखावलं,आन आला बक्षिस घ्यायाला. ठरल्यापरमानि बक्षिस दिलंच म्हाराजांनि.'

मी सोन्याला म्हनती, तू बास हेस, मला नगं बक्षिस.

'मंग बरं हाये. कवा निगायला पायजे हिराला ?'

'निघायचं लगुलगच. दुसरा काय हुकुमच नाय आमाला.तुमी इच्या-रलं म्हनुन ति म्हाराचं सांगितलं.'

'बक्षिस मिळालं ना त्याला ?'

अवं, काय करायचंय बक्षिस आपल्याला !

'व्हय तर.आन म्हाराज म्हनले,'गडकरी, मानुस लइ मोलाचा हाये. कायम गडाव राह्यला पायजे,तुमच्या जवळ.एक पाय कलम करा.'

'आयव ! ही बक्षिस व्हयवं ?'

कारभाऱ्यानि कपाळाव हात मारुन घेतला, त्यो मला ऐकु आला. सासरं घुटक्या गिळित बोलाय लागलं,

'अवो, लेकुरवाळी पूरगी ती. ती काय पैनीवर उतारलीय का ?

कशि लावायची तिला ?'

काय केलं बया ! वरच का नाय राहिलि मी ? त्याला काय म्हनुसा त्या घोगऱ्या भटजीला, आन त्या ढवाळजेवनाच्या कमळीला !

मनात असं म्हनतीय त ती अवघाडल्याली कमळी नदरंम्होरं आली. आन वाटलं, नाय बया, तिलाबि बाळ व्हइल माझ्या सोन्यावानि. तिलाबि बिचारिला धावपळ करावि लागंल त्याला पाजायला कधितरि.

तितक्यात काय झालं, सोन्यानि माझ्या तोंडाकडं बघितलं आन खुदकुनि हसला.

मला बारा बैलाचं बळ आलं. सोन्याला खांद्याव टाकला आन गीली मी बाहेर. कारभाऱ्यानि गुडघ्यात तोंड घातलं व्हतं. सासरं डोकं धरुन बसलं व्हतं. शिपाइ त्यांच्याकडं बघत व्हतं. मी त्यांच्याच म्होरं गीली.
"मी हिरा. हा माझा सोन्या. लगुलग निघायचं ना ? चला उठा. यकटी मातर मी यायची नाय. सोन्याला संगं घिउन यिइन. मला बक्षिशि द्याय-चिय ना, खुशाल द्या. कोनचाबि पाय खांडुन टाका. न्हायतर दोन्ही खांडा. पन गडाव नाय न्हायचि मी. खुरडत खुरडत खाली यिइन.कायम माझ्या सोन्याजवळ राहिन. मंग न्हाय रातचं यीरीचं कड्यावनं उतराय लागायचं. "

समदी गप, पन टकाटका बघत्यात. शिपायांलाबि काय सुचाना. कारभाऱ्यानि तोंड वर काढलं. त्यानला म्हनलं,
"उठा वं. वरात राहिलि व्हती आपल्या लगनाची. आज अनायाशि शिपाइ म्होरं हायेत. गडाव जाइल वरात. जूडीनि पाया पडू. शिरकाइच्या न् माझ्या डोंगराइच्या."

शिपायासकाट समदी तटातटा उठली. सोन्या खांद्यावरच. मी लागली चालायला.

आन तवाच आल्या आत्याबाइ. गडावनं लगबगीनं येत व्हत्या. पन शांत व्हत्या बघा. माझ्याजवळ आल्या आन म्हनल्या,

'ही शिपाइ आलं व्ह्य ? दरवाज्यालाच समाजलं मला.ज्याच्यात्याच्या तोंडी हिरा गवळन. अवं केलं तरि काय तिनि ?लेकराला पाजायला आली येवढंच ना ? तुमाला वाटतंय आनखिन कुनि येत्याल जात्याल त्या वाटंनि.कुनाचि माय यीलिया त्या वाटंनि जायला,दाखवाच मला आन असलाच कुनि मैंद तर न्ह्या धरुन त्याला. त्यो दाविल वाट पैक्यासाठी. लेकुरवाळी न्हाइ तसलं पाप करायची.'

आन पाटी तिथंच टाकून आत्याबाइ लागल्या माझ्यासंगं चालायला. शिपायांलाबि काय म्हनता येइना. वाडीवलि मानसं येकयेक गळत गीली. आमी चौघंच मोठी मानसं गेलो गडावर. पाचवा माझा सोन्या. सगळ्यात मोठा ! गेलो दरवाज्याला. तिथं चौकीदारइ नव्हता न् नाईकबि नव्हतं. नवीच कोन व्हती. कुनी का असानात, मला काय त्यांचं.

मोठ्या वाड्यात पोचलू. तिथं लग्नाच्या मांडवावानि मानसं. म्या म्हनलं खरीच वरात झाली. आमचीबि न् सासुसासऱ्यांचीबि. आन त्या तिथं देवळातल्यावानि मखार. मंग तु तु तु तु करुन शिंग वाजलं. आन ति पगडीवालं न् पट्टीवालं कायनुबायनु म्हनाय लागलं. शिवाजी म्हाराज येवढं दोन सबाद मला कळलं. आन आलं ना ति. आन बसलं मखरात. समदी उभी राहिल्यालि खालि बसलि.

मंग कायकाय चालु झालं त्यांच्या तिकडं. मी बघतिय ह्याच्या त्याच्या तोंडाकडं. घडीभर झाल्यावर मला वाटलं, वाइच सोन्याला पाजावं. म्या शिपायाला म्हनलं, 'मला वाइच आडुशाला बसवा. लेकराला पाजति उलिसं.' त्यानि यका बाजुला नेलं. सोन्या प्यायला लागला.

इतक्यात आरुळि आली, 'हिरा गवळऽऽन !'

माझ्या जवळचा शिपाइ घाइ करायला बघत व्हता. तिकडं दुसरा शिपाइ म्हनला,'म्हाराज, ती लेकराला पाजतिया.'

'पाजुन झाल्यावर आना.'

ति ऐकल्याव शिपायाची घाई वाइच कमी झाली.सोन्याला खांद्याव टाकुन

मी माघारी आली.पुन्हा हिराच्या नावाचा पुकारा झाला, तवा मला पुढं नेलं. शिपाइ मला म्हनला,

'म्हाराजांला दंडवत घाल.'

सोन्याला घिउनच मी लागली भुइला नाक टेकवायला. तवा म्हाराजच म्हनलं वाटतं,

'ऊठ मुली. सांगा हिची कथा.'

'म्हाराज 'यवढा सब्द ऐकला आन म्या नाइकाचा आवाज वळाखला. बघितलं त नाइकच व्हतं ति. त्याच्याव, मी रोज दुद घालायला यायचि तिथुन सारं सांगितलं त्यांनी.आमी कड्याव गेलतो तीबि त्यांनि सांगितलं.मंग म्हाराज बोललं.

'नाईक, तुम्ही डोनज्याचं. डोनागिरी चढला व्हता.'

'म्हाराज !' म्हनुन नाइकानि दंडवत घातला.

'गवळन जिथून उतारली,ती जागा तुमी सोता बघितली हाये.तिथून चढउतर करताल का तुमी ?'

'म्हाराज,तुमच्या आशिर्वादानि आन सुभेदार पुढं व्हतं म्हनून डोनागिरी चढलो. पन ह्या कड्यावरनं हिरागत माझि मला उतारता यिईल असं काई वाटत नाही.'

'गडकरी, तुमचं काय म्हननं ?'

'म्हाराज, जागा इतकी अवघाड म्हनून तर उघडी ठिवली. नायतर तट, बुरूज काहीतरी बांधलाच असता.'

'मंजी ह्या बाइनि परकर्म केलंय.'

मी आपली खाली बघून ऐकत व्हती. परकर्म सब्द ऐकल्याबरुबर म्या तट्‌कुनि वर बघितलं. महाराज परकर्म म्हनत्यात ? नाइकावानि आपुनबि दंडवत घालुशि वाटलं. तितक्यान आनिक कुनितरि बोललं,

'म्हाराज, परकर्म खरंच. पन गडाचा नेम मोडून तिनं गुन्हासुधा केलाय.'

'पंडितराव, गुन्ह्याला शिक्षा काय ?'

माझ्या जिवाची धाकधुक सुरू झाली. वाडीत धिटाइनं म्हनली व्हती, दोन्ही पाय खांडुन टाका म्हनुन. आता खरंच पाय खांडाय लावलं तर ? इच्यारानिच पाय मोडल्यागत झालं.

पन तवाच सोन्या जागा झाला आन खेळायला लागला. शिक्षाचं इसारलं त्याच्यात. त्याला काय वाटलं ति त्यानि दोन्ही हात माझ्या डोळ्यावर ठिवलं. मला निस्तं ऐकुच यायला लागलं.

'म्हाराज, नेमापरमानि शिक्षा देता यिइलच.पन आरुपी कोन,गुन्हा कशासाठी केला ही सगळं बघून शिक्षा कमीजास्ती करता यिईल. आरुपी येक बाई हाये. गुन्हा पहिलाच. नाकळता घडला. गडाला धोका द्यायचा हेतू नव्हता. ह्या साऱ्याचा इच्यार करता यिइल.'

'आरुपी येक बाई, त्यानि काय व्हईल ?'

'म्हाराज, बाईमानसावर दया दाखवता यिईल.'

म्हाराज दावत्याल का दया. म्हनत्यात म्हाराज कडकबि हायेत आन दयाळूबि हायेत.

'पंडितराव, यवढ्या परकर्मी बाईवर दयाऽ दाखवावी म्हनता ?'

'म्हाराज, आमी सांगितलं सास्तार. परकर्माचा मानसुधा करत्यात. म्हाराज न्यावच करत्याल, अन्याव करायचं नाहीत.'

सोन्यानि माझ्या डोळ्यावलं हात काढलं. म्हाराजांनि माझ्याकडं नदर टाकली. म्हनले,

'मुली, अशी पुढं ये.'

दोनतीन मानसं मागंपुढं सराकली. मी अडखाळत पुढं गीली.

'नाव काय तुझं ?'

" हिरा."

हिरा म्हनली मातर, माझ्या ध्यानात आलं, समदी आधि म्हाराज म्हनत्यात. म्या सुदरुन घेतलं, म्हनली, "म्हाराज, हिरा."

म्हाराज हसलं. का हसलं काय माहीत. मंग म्हनलं,

'पंडितराव, योक परकर्मी हिरा आमच्याकडं आधिच हाये. म्हनुन ह्या मुलीला आमी आजपसून हिरकनी नाव देतो. त्यात किताबत आली का नाही ?'

'म्हाराज,त्यात काय संशोव नाही. हिला आपुन रत्नाचा मान दिला.'

'हिरकनी, आता तुला काय पायजे सांग.'

"म्हाराज, आता मी घरी जाऊ ?"

यवढा हशा झाला तिथं, मी आपली गेड्यावानि बघतच राहिली. म्हाराजसुधा हसलं. मंग म्हनलं,

'तुला काय घाईये ? दरवाजा बंद झाला तरी उभ्या कड्यावरनं जाशील, नाय का ?'

"न्हाइ म्हाराज. आज सोन्या माझ्यासंगंच हाये ना."

पुन्हा समदी हसली. म्हाराज नाय हसलं. आन समदी यकदम गप झाली. म्हाराज म्हनलं,

'पंडितराव, दंडक सांगा.'

'म्हाराज, समाजलं नाय.'

'मघाशी म्हनलात, हिनं गुन्हा केलाय. आता हिनं सांगितलं त्याच्यावरून तुमचं मत्त काय ?'

'म्हाराज,मघाशीच म्हनलो हिचा पहिलाच गुन्हा हाये.ती पुन्हा त्योच गुन्हा करनार नाय.'

'पंडितराव, सास्तरातला न्याव तुम्ही सांगितला. देवाच्या दारचा न्याव हिरकनीनि सांगितला.हिरा गवळन कड्यावरनं उतारली नाही येका लेकराची आई त्याच्यासाठी जिवावर उदार झाली. हा, हा देवाचा दंडक हाये.'

मी आपली ऐकतिया. ते पंडितराव मान हालावत्यात. मला वाटतंय म्हाराज कवा यकदा जा म्हनत्यात. तर म्हाराज येगळंच बोललं,

'गडकरी, हिराजींला या म्हनावं.'

ते गडकरी म्हाराज म्हनुन,मुजरा करुन लगबगीनि गेलं. मंग हातात झाकल्यालं ताट घिउन दुसरं सरदार आलं. मुजरा घालित गेलं म्हाराजांच्या जवळ. म्हाराज म्हनलं,

'मंडळी,आम्ही भवानी आईचं भक्तऽ.ती साऱ्या जगाची आई. आमच्या मासाहेब आमच्या आन सोराज्याच्या आई. हिला हिरकनीची पदवी दिली. ही घराघरातली आई. हिचा मान केलाच पायजे. हिरकनीऽ, हिकडं ये.'

मी सोन्याला घिउनच म्हाराजांच्या मखराजवळ गीली. हिराजींनी ताटावरलं पांघरुन काढलं. आन म्हाराजांनी हा, हा पदुर उच्यालला आन ह्या माझ्या खांद्यावर घातला. मला काय सुचाना. काय दिसानाबि. डोळं भरून आलं. सोन्यानि मातर ति लुगडं हातात धरुन घट् मुठ कीलि. आन म्हाराजांच्याकडं बघुन कि वो हसला.

'हिराजी, आईची चूळीबांगडी झाली. सोन्यासारख्या लेकराला..'

मी मनात म्हनतिया, म्हाराजांला सोन्याचं नावसुधा माहिती.

'म्हाराज, बोलावनं बाइलाच तेवढं केलतं..'

'हिराजी,बाई यकटी यिइल.आई कशी यकटी यिइल ?बघा लौकर.'

हिराजी धावलंच. मुजरासुधा राहिला. तडकाफडकी माघारी आलं. हातातच लेकराचा पोशाक घिउन आलं.म्हाराजांनी पोशाकाला हात लावला. मंग म्हनलं,

'हिरकनी, ही घे लेकराला. काय नाव त्याचं ?'

"सोन्या, म्हाराज."

'सोनबा, बहादुर आईचं दुद पेतोयस. दनकाट हो आन सोराज्यात गड राख.'

सोनबा पदुर धरुनच व्हतं. शिपायांनी मला माझ्या जाग्याव आनलं. मला वाटलं, आता जायचं. त कशाचं काय ! तिकडं म्हाराज म्हनलं, 'हिराऽ'. दचकुन त्यांच्याकडं जाया लागली तर हसुन म्हनत्यात,

'अग तू नाय. तू हिरकनी हायेस. हिरा, गड मजबूत बांधलास. पन डूंगुर कच्चा राहिला येक जागी. यका आईनि त्याला हरावला.'

'म्हाराज, तिनदा जाउन बघुन आलो.उद्यापसुन कडा तासायचं न् बुरजाचं काम चालू करायचा हुकुम व्हवा.'

'शाबास हिरा. आनिक याक कर.. पायाभरनीला ह्या हिरकनीला बोलव.'

तऽर अशि आमची वरातऽनिघाली, माझं नवं बारसंऽ झालं, सोन्याच्या आईला वरमाइचं लुगडंऽ मिळालं, समदं यकाच दिशी. दिवस कलता, म्हाराजांच्या म्होरनं निघुन वाडीला आलो, तर पुन्हा ही गर्दी अंगनात. अंधार पडंस्तवर निसता गूंधूळ. ही याक बोलतंय, ती याक बोलतंय. मला ऐकायचंच काम.

'अग बया, काय मउसूत लुगडं हाये व.'

' जरीचं असंल, नाय व.'

'हिरी त दिसायचीच नाय हि नेसल्याव.'

'आगं, शीनकूर करतानि नीसू नगं बरं का.'

'राधीबाय, तू कुठंशि व्हतिस ग ?'

'कशासाटि ग यवढा मान केला हिरीचा ?'

'सोन्या, ल्यका, आइला तरास देउ नको आता.'

'हिराला लुगडंचूळी मिळाली आन तुला रं ?'

'आबा, शिपायांनि मागुन काय तरास दिला का व ?'

'आता शेरडाकरडांलासुधा पोशाक दिला पायजे,बरं का नाना.अवं, कुठूनबि चढत्यात न् कुठंबि तरातरा उतारत्यात.'

'का रं बिट्ट्या, तुझ्या पोटात दुखाय लागलं व्हय ? अरं आळशा, टंगड्या हलवीत पासव बसतुस त्याच्यापक्शी,वाइच कामधंदा कर.'

आत्याबाईंनी सगळ्यांच्या हातावर उलिउलि गुळाचा खडा ठिवला आन आभाळाकडं हात जूडून म्हनल्या,

'टळलं बया संक्याट.'

सगळी पांगापांग झाल्यावर आमी घरात आलू. तव्हा ननदंला सारी कापडं बघाय मिळाली. सोन्याचा पोशाक तिनि उलगाडुन बघितला.

'वैने, तॉ बघितलंस का ? सोन्याचा पोशाक लई डगळ हाये. चार

वर्साचा होस्तवर त्याला नाइ व्हयाचा.'

"गडबडीत आनला ना.असुन द्या. कळता झाल्याव घडी मूडू."

सांजच्या भाकरी भाजायला मी चुलीपुशि बसली. समदी बसली जेवायला. दीर लई कळकुदावना. दादाला म्हनतु,

'दादा, तूबि गेलता म्हाराजांच्या म्होरं ?'

'मी कुठं कड्यावनं उतारलो व्हतो ?'

'तूसुधा उतारला असतास दादा.'

'हूं.'

'तसा तूबि डोंगरचालीला खंबिर हायेस.'

'मंग ?'

'तुलासुधा पोशाक दिला असता म्हाराजांनी.'

'मंग कशात अडलं ?'

'खाली आल्याव सोन्याला पाजलं असतं का तॉ ?'

ए माझ्या दैवा ! कुठून काय सुचंल ह्या दिराजीला, ठावं नाय. सकाळधरनं कारभाऱ्यांचं चित् नाय जाग्याव. आता ही आलं फुनगी लावायला. चुलीतला जाळ बाहेर आलता, म्हनुन पान्याचा शिडुका मारला तर त्यो इझला. पन ह्यो भडका उडाला तर ? पर नशिब चांगलं व्हतं माझं. कारभारी म्हनलं,

'पिऱ्या, तुला पोरं झाल्याव तूच पाज बरं का त्यानला.'

असं निभुन गेलं त्या दिशि. पन सताठ दिसानि पायाभरनीसाठी बोलवाया आलं ना मला, त न्हाय आलं माझ्यासंगं. म्हनलं,

'मान तुझा हाये. मी यिउन काय करू ? मागं कुठं गर्दीत उभं

न्हायचं, त्याच्या पक्शि घरीच राहिल्यालं काय वाईट ?'

म्हाराजांची साडीचूळी लिउन शिपायासंगं यकटिच गीलि गडावर मी. दरवाज्याच्या पायऱ्या चढली, तर चौकीदारानि मुजरा केला. मला आलं हसू. तवा त्यानि निट बघितलं माझ्याकडं. आन त्याचा हात लुळ्यागत खालि गेला. यकदम वाचा फुटल्यावानि म्हनला,

'हिरा ? मोठी देसमुखिन व्हउन आलियास कि.'

"देसमुखिन नाय व. हडळ व्हउन आली.'

मी असं म्हनली न् हसाय लागली. त्यालाबि हसायला आलं. मंग मोठ्यानि हाका मारुन म्हनतो,

'नाईक, अवं नाईक, ह्या बघा कोन आल्यात.'

'कोन ? हिरा ? नाइ, हिरकनी ! या या या. पायाभरनीला चालला ना ? चला, मीबि येतो.'

"अवं दादा,मला कशाला अवंजावं करता! यायचंय तुमाला तर चला ना."

आलो आमी ह्या हितं.हिराजी म्होरं आलं. 'या' म्हनलं. पाट मांडला व्हता पायाच्या चराशेजारी. तीन भटजी व्हतं. त्यात येक घोगरे भटजी. उन्हासाठी डोळ्याव हात धरुन बगितलं त्यांनी मला. आन बोललंच,

'शिंचे, तुझं लगिन म्या लावलं. आज वळखू येत नाईस ती.'

"काका, त्याला आता मी काय करु वो."

'बरं बरं. तुझंच नाव हिरकनी ठिवलं काय म्हाराजांनी ?'

तेवढ्यात दुसरं भटजी म्हनलं,'चला हिराजी. मुहुर्त भरत आला.'

हिराजी म्हनलं,

'या हिरकनी, पाटावर बसा.'

घोगरे भटजी जनु काय किचाळलंच,

'हिराजी, बाईला अधिकार नाही पायाभरनीचा.'

मी म्होरं सरलीच नाय. लुगड्याचा झोजा घिउन पाटाव बसायचंबि संक्याटच व्हतं.

हिराजींचा चेहरा खर्‌कुनि उतारला. पन ति झालं म्होरं न् बसलं पाटावर. मोठ्या भटजीनि कायनुबायनु म्हनलं.घोगऱ्या भटजीचा आवाज निराळाच ऐकायला येत . व्हता. पुजा झाली. हिराजींनी कोपऱ्या बसावला.त्याच्या पाया पडुन ति झालं बाजुला.

मी पुढं सरली. पाटाच्या खालीच, उभ्याउभ्या वाकुनच हळद, कुकू वाहिलं. पाया पडली आन मागं सरली.

परसाद घिउन घरी आली. धडुतं नीसली. साडीचूळी बांधुन ठिवली. सोन्याचा पोशाक तिच्यातच बांधला.

बाहेर जाउन वासरांला पानी दावलं. हिराची हिरकनी झाली ती गडाव राहिली. हिरकनीची हिरा झाली ती गुरापोरांच्या सवसाराला लागली.

पाचाडाच्या वाटंनि जातायेता उभ्या कड्यावर काम चालल्यालं दिसायचं. कडा पार तासुन काढित व्हते. झालंच तर खाली, वर, भिताडांचं काम चाललं व्हतं. व्हताव्हता काम पुरं झालं आन उभा कडा पार बदलुन गेला. कामा ना काजानि मीबि जायची गडाव. पन वाट वाकडी करुन हिरकनिच्या बुरजाव नाय गीली कधी.

चैताचा महिना आला. वाडीतलं कुनीतरी म्हनलं, गडाव दीवीचं नवं देवाळ झालंय, पुनवंला जत्रा हाये. सगळ्यासंगं मीबि गीलि. हिरकनीची साडीचूळी नीसुन गीली. दरवाज्यातनं मानसं उजवीकडंच चालली व्हती. देवाळ बारकंच पन नक्षीदार व्हतं. दीवीचं दरशान घ्यायला ह्री गर्दी. म्हनुन मी वाइच पड्याल गीली, तर बुरुज दिसला. वरखालीं पहारा व्हता. वाइच जवळ जायला बघितलं तर शिपायानि दटावलं,

'कोन वं बाइ ? हिकडं काय काम हाये ?'

"दीवीला आलिया. ति वाइच पुढं आली. हिरकनी माझं नाव."

'बुरुंज त आत्ता झाला. तुमचं नाव हिरकनी कसं व ठिवलं आधी ?'

जिभंवर आलतं, 'बाबा, माझंच नाव दिलंय बुरजाला.' पन जीभ आवारली.दीवीकडं आली. धसकाबुसकी करित आत शिरली. समइच्या उजेडात नीट दिसत नव्हतं. वाइच डोळं सरावल्याव दिसलं. आन म्या दीवी तवाच वळाखली. आमच्या डोंगराइच्या दगडाला दोन चकमकित डोळं बसावलं व्हतं. दीवीच्या म्होरं, हळद कुकू गुलाल पानं फुलं पैसं अडकं, साऱ्याचा निसता खच पडला व्हता. तिर्थ द्यायला बसलं व्हतं घोगरे भटजी. ह्यालात्याला सांगत व्हतं,


'सोयंभू दीवी हाये.पाया पडा. शिवराई टाका.दीवी कल्यान करील.'

म्या डोकं टेकावलं. तिर्थाला हात पुढं केलं.. घोगऱ्या भटजीनि मला वळाखलं नाय. मी गपचिप बाहेर आली. संगतीच्या मानसांला म्या डोंगराईचं काहीच सांगितलं नाय. पन आपलं आपुन, सालातनं यकदा, चैती पुनवंला दीवीला जायचा नेम केला. देवळापसनंच बुरजाकडं बघायचं.

दोनतीन वरसानि मोठा गाजावाजा झाला. समदी म्हनाय लागली, गडावर म्हराजांला अभिशेक व्हायचाय. चैतीला गडाव गीलती तवाच वाइच म्हाजुर व्हायला लागलं व्हतं. कुठुनकुठुन मानसं येत व्हती. पिराजी यकदा मुदाम गडाव जाउन आलं. माघारी आल्याव काय, त्यांची येकेक बात सवा सवा हात.

'वैने, गडाव ना, लाल तोंडाची मानसं बघितली. कोन म्हनलं, त्यातल्या यकट्याला येकेक बूकूड लागतु यका जेवनाला.आन हत्ती चढावलाय गडाव. आपुन जानार अभिशेकाच्या दिशी. तूबि चल. दादा यिउ नायतर नाइ यिउ. आला तरी तुला संगं नाय न्यायचा.'

व्हयनाही करता, अभिशेकाच्या दिशी गडाव जायचं ठरलं. म्या ती हिरकनीची साडीचूळी काढली. सोन्याचा पोशाकबि निघाला. म्हनलं आता सोन्याला व्हइल नेमका. घालुन बघितला त काय ! सोनबा सरदार दिसाय लागलं. आत्याबाइ म्हनल्या, अग पोराची दिष्ट काढ. त्यांनीच


उत्तर
बामनवाडी
पेठ
वाडा
दरवाजा
बुरुज
टकमक
खिंड

पु. ल. देशपांडे यांच्या ७५ आवडत्या पुस्तकांपैकी एक
महाभारत कथेतील पवित्रभीषण नाट्य
**एकलव्य**
राज्य पुरस्कार, १९७४

महाभारतातील नियोगप्रसंगातल्या स्त्रियांचे संघर्षनाट्य
**वंशाचा व्यास**

थोर वैज्ञानिकाचे जीवननाट्य
**युरेका**

या आगळ्यावेगळ्या नाटकांच्या परंपरेतले
सामान्यांतल्या असामान्य आईचे हे एक नाट्य
**हिरकनी**

संमत

ISBN 81-85280-07-X